www.lokrakshanay.com

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

# लोकरक्षणाय

• LOKRAKSHANAY • RNI TC NO. MAHBIL10469

•Editor- Rakesh Shankar Gore •Daily •Thane •Volume-01, Issue-202 • Tuesday, 26 December 2023 •Pages-04 •Rs.2/-

### अनमोल विचार

*"कला अशी हवी की, एकाच वेळी लाखांशी बोलू शकेल."*

## लक्षवेधी

### 'मिमिक्री करणे, हा माझा मूलभूत अधिकार असून मी ती सहस्रो वेळा करीन !

**कोलकाता बंगाल :** संसदेबाहेर आंदोलन करतांना तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी सभापती आणि देशाचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची नक्कल केली होती. यावरून त्यांच्यासह अन्य अनेक खासदारांना निलंबित करण्यात आले आहे. या घटनेवरून कोलकाता येथील एका सभेत बोलतांना खासदार कल्याण बॅनर्जी म्हणाले की, मी मिमिक्री करत रहाणार आहे. ही एक कला आहे. आवश्यकता भासली, तर सहस्रो वेळ करीन. मला माझे मत मांडण्याचा मूलभूत अधिकार आहे. तुम्ही मला मारू शकता; पण मी मागे हटणार नाही, मी लढत राहीन. बॅनर्जी पुढे म्हणाले की, कुणालाही दुखावण्याचा माझा कोणताही हेतू नाही. मला एक प्रश्न आहे.

### गुरुग्राममधील जगन्नाथ मंदिराची भिंत कोसळली; एका कामगाराचा मृत्यू

**नवी दिल्ली :** दिल्लीला लागून असलेल्या गुरुग्राममध्ये सोमवारी मोठी दुर्घटना घडली. सेक्टर १५ मधील भाग २मध्ये बांधकाम सुरु असलेल्या जगन्नाथ मंदिराची भिंत कोसळली. यावेळी ढिगाऱ्याखाली पाच जण जागीच गाडले गेले. अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी पोहोचलेल्या बचाव पथकाने सर्व कामगारांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी बचाव मोहीम राबवली, त्यानंतर सर्वांना बाहेर काढण्यात आले. सर्व कामगारांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. चार जणांची प्रकृती गंभीर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. तर एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. सिव्हिल लाइनवर असलेल्या जगन्नाथ मंदिरात तळघर बांधण्याचे काम सुरू होते, त्यात अनेक मजूर काम करत होते. तळघरातील माती उद्धवस्त झाल्याने जवळील भिंत खालून तुटून कामगारांवर पडली. त्यात चंद्रपाल (२६) या मजुराचा मृत्यू झाला. एनडीआरएफ आणि एसडीआरएफ नागरी संरक्षण दल कार्यरत आहेत.

### 'वीर बाल दिना'निमित्त कार्यक्रमात पंतप्रधान होणार सहभागी

**नवी मुंबई :** नवी दिल्लीतल्या भारत मंडपम येथे २६ डिसेंबर रोजी सकाळी साडेदहा वाजता 'वीर बाल दिना'निमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी सहभागी होणार आहेत.या कार्यक्रमात ते दिल्लीतल्या तरुणांच्या संचलनाला हिरवा झेंडा दाखवतील. या दिनाचे औचित्य साधून नागरिकांना विशेषतः लहान मुलांना, साहिबजादा यांच्या अतुलनीय शौर्य गाथांची माहिती करून देणे आणि त्यांच्यात जागृती निर्माण करण्याच्या उद्देशानं सरकारच्या वतीनं देशभरात नागरिकांचा सहभाग असलेल्या विविध कार्यक्रमांचे आयोजन केलं जाणार आहे. देशभरातल्या शाळा आणि बालसंगोपन संस्थांमध्ये डिजीटल स्क्रीनच्या माध्यमातून साहिबजाद्यांच्या जीवनगाथा आणि बलिदानाची माहिती देणारं प्रदर्शनही आयोजित केलं जाणार आहे. या निमित्तानं देशभरात 'वीर बाल दिना' विषयी एक चित्रपटही दाखवला जाणार आहे. यासोबतच MYBharat आणि MyGov पोर्टलच्या माध्यमातून संवादात्मक स्वरुपातल्या ऑनलाईन प्रश्नमंजुषांसारख्या स्पर्धांचंही आयोजन केलं जाणार आहे.

### 'आंतरराष्ट्रीय नाणेनिधी'चा अहवाल सर्व भारतीयांसाठी चिंता वाढवणारा

**नवी दिल्ली :** गेल्या काही वर्षात भारतावरील कजार्चे प्रमाण लक्षणीय रित्या वाढले आहे. त्यासंबंधात आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने अभ्यासकरून जो एक अहवाल नोंदवला आहे त्यात त्यांनी म्हटले आहे की, सन २०२७-२८ च्या वित्तीय वर्षात भारतावरील कजार्चे हे प्रमाण त्यांच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या शंभर टक्के किंवा त्यापेक्षाही आधिक होण्याची शक्यता आहे.भारतीय अर्थकारणासाठी हा अंदाज चिंताजनक मानला जात आहे. तथापि अर्थमंत्रालयाने मात्र हे अमान्य केले आहे. अर्थमंत्रालयाने म्हटले आहे की नाणेनिधीने काढलेले हे अनुमान अवास्तव आहे. अन्य देशांच्या कर्जस्थिती विषयी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने काढलेले अनुमान हे भारतापेक्षा अधिक तीव्र आणि खराब आहे. त्यांच्या मानाने भारताची स्थिती चांगली राहील असा विश्वास अर्थमंत्रालयाने व्यक्त केला आहे.

### कोलकाता येथे १ लाखाहून अधिक लोकांनी केले सामूहिक गीतापठण !

**कोलकाता :** नुकत्याच झालेल्या गीता जयंतीनिमित्त येथील ब्रिगेड परेड मैदानावर २४ डिसेंबर या दिवशी १ लाखाहून अधिक लोकांनी एकत्र बसून गीतापठण केले. हा विश्वविक्रम ठरला. या कार्यक्रमाचे आयोजन अखिल भारतीय संस्कृत परिषद आणि मोतीलाल भारत तीर्थ सेवा मिशन यांनी केले होते. यात देश आणि विदेश येथून ३०० हून अधिक संत उपस्थित होते. याखेरीज बंगालचे राज्यपाल सी.व्ही. आनंद बोस, मुख्यमंत्री ममता बनर्जी आणि अन्य मान्यवर यांना आमंत्रित करण्यात आले होते. आयोजकांनी सांगितले की, या पठणामध्ये सहभागी होण्यासाठी १ लाख ३० सहस्र लोकांनी नावे नोंदवली होती. पठणाच्या वेळी ६० सहस्र महिलांनी एकत्रित शंखनाद केला. हाही एक विश्वविक्रम झाला.

### 'खर्गेंचे नाव पुढे आल्याने मी नाराज नाही, मी स्वतः कोणत्याही पदासाठी इच्छुक नाही.' - नितीशकुमार

**नवी दिल्ली :** इंडिया आघाडीच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत ममता बॅनर्जी आणि अरविंद केजरीवाल यांनी पंतप्रधानपदासाठी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांचे नाव पुढे केल्याने बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी नाराजी व्यक्त केल्याचे सांगितले जात होते.पण या विषयावर स्वतः नितीशकुमार यांनीच खुलासा केला असून त्यांनी म्हटले आहे की ह्मी नाराज किंवा निराश होण्याचा प्रश्नच नाही. मी स्वतः कोणत्याही पदासाठी इच्छुक नाही. त्यामुळेइंडिया आघाडीच्या नेतेपदासाठी काँग्रेस अध्यक्षांचे नाव पुढे केले गेले असेल तर त्याला माझा काही आक्षेप असण्याचे कारणच नाही.

# आता देशामध्ये ई-सिगारेटचे उत्पादन, आयात, निर्यात, विक्री आणि जाहिरात करण्यावर बंदी !

## ई-सिगारेट, तंबाखू उत्पादनाबाबत संशोधन करण्यावर केंद्रीय आरोग्य मंत्रालयाची परवानगी घेणे आवश्यक

**■मुंबई। यश सावंत,**

देशामध्ये ई-सिगारेटचे उत्पादन, आयात, निर्यात, वाहतूक, विक्री, वितरण, साठवणूक आणि जाहिरात करणे हे पेका (पीईसीए) २०१९ या कायद्यान्वये बंदी आहे. मात्र आता ई सिगारेट आणि तंबाखू उत्पादनाबाबत संशोधन करण्यावरही केंद्र सरकारने निर्बंध घातले आहेत. यासंदर्भात संशोधनासाठी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय आणि आरोग्य सेवा संचालनालयाची परवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

ई सिगारेटच्या व्यसनाच्या आहारी जाणारी तरुणाई आणि त्यांचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेता केंद्र सरकारने पेका (पीईसीए) २०१९ कायद्याअंतर्गत त्यावर बंदी घालण्यात आली. त्यानुसार उत्पादन, आयात, निर्यात, वाहतूक, विक्री, वितरण, साठवणूक आणि जाहिरात करण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. मात्र काही वैद्यकीय व्यावसायिकांकडून यावर संशोधन होण्याची शक्यता लक्षात घेत केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाने ई सिगारेट आणि तंबाखू पदार्थांवर संशोधन करण्यासही निर्बंध घातले आहेत. त्यासंदर्भातील सूचना आरोग्य विभागाने राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाला दिल्या आहेत. यामध्ये राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने त्यांच्याशी संलग्न असलेली देशातील सर्व वैद्यकीय महाविद्यालये आणि वैद्यकीय संस्थांमधील प्राध्यापक, सहप्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, पदव्युत्तर विद्यार्थी आणि इंडियन मेडिकल असोसिएशनने त्यांच्याशी संलग्न असलेल्या वैद्यकीय व्यावसायिकांना ई-सिगारेट व तंबाखू उत्पादनावर संशोधन न करण्याच्या सूचना कराव्यात असे निर्देश दिले आहेत.



## तीन नव्या फौजदारी कायद्यांवर शिक्कामोर्तब; राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूंनी केली स्वाक्षरी



**■नवी दिल्ली। प्रगती शर्मा,**

फौजदारी कायद्यांशी संबंधित तीन विधेयकांचं आता कायद्यात रुपांतर झालं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी तिन्ही विधेयकांवर स्वाक्षरी केले असल्याने त्यांचे कायद्यात रुपांतर झाले आहे. भारतीय न्याय (द्वितीय) संहिता २०२३, नागरिक सुरक्षा (द्वितीय) संहिता २०२३, भारतीय साक्ष (द्वितीय) हे तीन कायदे अस्तित्वात आले आहेत. फौजदारी प्रक्रियेशी संबंधित तिन्ही विधेयक राज्यसभा आणि लोकसभेमध्ये मंजूर झाली होती. त्यानंतर ती राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे सादर करण्यात आली. राष्ट्रपतींनी तिन्ही विधेयकांवर स्वाक्षरी केली असल्याने त्यांचे आता कायद्यात रुपांतर झाले आहे. ब्रिटिश काळांपासून लागू असलेल्या जुन्या फौजगारी कायद्यांना हटवून त्यांचे भारतीयकरण या कायद्यांच्या माध्यमातून करण्यात आलं आहे. संसदेचे हिवाळी अधिवेशन ४ डिसेंबर ते २२ डिसेंबर दरम्यान बोलावण्यात आले होते. तिन्ही कायदे लोकसभेत मंजूर झाल्यानंतर ते राज्यसभेत मांडण्यात आले होते. अनेक विरोधकांचे निलंबन झाले असल्याने फारशा चर्चेविना विधेयकं मंजूर करण्यात आले. यावेळी दूरसंचार नियमनासंबंधी आणि निवडणूक आयुक्तांच्या निवडीसंबंधी विधेयक देखील मंजूर करुन घेण्यात आले. भारतीय न्याय (द्वितीय) संहिता २०२३, नागरिक सुरक्षा (द्वितीय) संहिता २०२३, भारतीय साक्ष (द्वितीय) विधेयकांच्या मंजुरीवेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा राज्यसभेत बोलताना म्हणाले की, तीन नव्या विधेयकांचा हेतू शिक्षा देण नसून न्याय देणे हा आहे.

## थर्टी फर्स्टसाठी पहाटे ५ पर्यंत हॉटेल सुरु ठेवू द्या, शिंदे सरकारकडे असोसिएशनची मागणी



**■मुंबई। दिगंबर जाधव,**

यंदा नाताळ व नववर्ष स्वागताचा उत्साह अधिक आहे. ही हॉटेल उद्योगाला नवसंजीवनी मिळण्यासाठी मोठी संधी आहे. त्यामुळे नाताळ व थर्टी फर्स्टसाठी पहाटे ५ वाजेपर्यंत परवानाकृत हॉटेल सुरू ठेवण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी हॉटेल व रेस्तरां असोसिएशन पश्चिम भारत (हरवी) यांनी राज्य सरकारकडे केली आहे. हरवी ही राज्यभरातील हॉटेल व्यावसायिकांची मोठी संघटना असून ७२ वर्षे जुनी आहे. असोसिएशनने कायम नियमांच्या अधीन राहून व कायदेशीर व्यवसायाला बळ दिले आहे. त्यामुळेच राज्य सरकारने केवळ परवानाधारक हॉटेल व रेस्तरां यांना अशी परवानगी द्यावी, असे असोसिएशनने म्हटले आहे. यासाठी त्यांनी राज्याचे प्रधान सचिव (गृह) राधिक रस्तोगी, पोलिस महासंचालक रजनीश सेठ व मुंबईचे पोलिस आयुक्त विवेक फणसाळकर यांना पत्र लिहिले. ह्यनाताळ व नववर्षाच्या उत्साहाचे स्वागत करण्यासाठी सर्व हॉटेल व्यावसायिक सज्ज आहेत. आमच्या या ग्राहकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत हॉटेल व्यवसाय पहाटे ५ वाजेपर्यंत सुरू ठेवण्याची परवानगी मिळावी. आमचे सर्व सदस्य उच्च दर्जाच्या सुरक्षेचे पालन करीत सेवा देतील, असे असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप शेट्टी यांनी सांगितले.

## देवेंद्र फडणवीस यांना मानद डॉक्टरेट होणार प्रदान



**■मुंबई। अनिकेत भंकाळ,**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मंगळवारी, 26 डिसेंबर जपानमधील कोयासन विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट प्रदान केली जाणार आहे. मुंबई विद्यापीठातील दीक्षांत सभागृहात हा कार्यक्रम सायंकाळी ५ वाजता होणार असून, कोयासन विद्यापीठाचे प्रमुख अधिकारी यावेळी उपस्थित राहतील. देवेंद्र फडणवीस हे ऑगस्टमध्ये जपान दौऱ्यावर गेले असता कोयासन विद्यापीठाने यासंबंधीची घोषणा केली होती. कोयासन विद्यापीठाने 120 वर्षांच्या इतिहासात प्रथमच मानद डॉक्टरेट पदवी बहाल करण्याचा निर्णय घेतला असून, ती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रदान केली जाणार आहे. पायाभूत सुविधा, औद्योगिक विकास, जलयुक्त शिवारच्या माध्यमातून जलसंधारणाच्या क्षेत्रात केलेले कार्य आणि महाराष्ट्रात सामाजिक समानतेसाठी केलेले कार्य यासाठी ही मानद डॉक्टरेट त्यांना प्रदान करण्यात येणार आहे. कोयासन विद्यापीठाचे प्रो. इन्युई रुनिन, वाकायामा प्रांताचे आंतरराष्ट्रीय व्यवहार विभागाचे संचालक यामाशिता योशियो, जपानचे मुंबईतील कौन्सिल जनरल डॉ. फुकाहोरी यासुकाता तसेच प्रमुख पाहुणे म्हणून उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर आणि मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी आदी मान्यवर हे यावेळी प्रामुख्याने उपस्थित असतील.

## 'ये देश रहना चाहिए, इस देश का लोकतंत्र रहना चाहिए'; मनसेचा मोदी सरकारला टोला



**■मुंबई। सचिन कदम,**

देशाचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त आज देशभरातून त्यांना अभिवादन केलं जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि इतर सर्व नेत्यांनी अटलबिहारी वाजपेयींना आदरांजली वाहिली.

दिल्लीतील सदैव अटल समाधी स्थळावर केंद्रीय मंत्री, भाजप नेते आणि एनडीए नेत्यांनी उपस्थिती दर्शवली. देशाच्या जडणघडणीत अटबिहारी यांचं मोठं योगदान आहे. आज त्यांची ९९ वी जयंती साजरी होत आहे. त्यानिमित्ताने सोशल मीडियातूनही त्यांना आदरांजली वाहिली जात आहे. सध्या केंद्रात आणि राज्यात भाजपा आघाडीचे सरकार आहे. विशेष म्हणजे गेल्याच आठवड्यात ससंदेत विरोधी पक्षांच्या तब्बल १४१ खासदारांचे निलंबन करण्यात आले आहे. त्यावरुन, केंद्रातील मोदी सरकारवर टीका होत आहे. आज अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीदिनी मनसेनं अटलबिहारी वाजपेयी यांचा संसदेतील एक व्हिडिओ शेअर करत त्यांच्या आणि तत्कालीन सरकारच्या कामकाजाची पद्धत सांगितली आहे. सरकार येईल, आणि जाईल.

## लोकसभा निवडणूक सर्व्हेवर निष्कर्ष काढू नये, कारण...; शरद पवारांची प्रतिक्रिया



**■पुणे। अभिजित येरल्लू,**

जर राज्यात लोकसभा निवडणूक झाली तर महायुतीला जोरदार फटका बसेल आणि महाविकास आघाडीला यश मिळेल असा अंदाज सी व्होटरच्या सर्व्हेमधून दिसून आला. या सर्व्हेवर अनेक राजकीय नेत्यांनी त्यांची प्रतिक्रिया त्यात शरद पवारांनी सर्व्हेवर भरवसा ठेऊ नका असं थेट स्पष्ट शब्दात सांगितले. पुण्यातील भीमथडीचे प्रदर्शन पाहण्यासाठी आले होते.त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला शरद पवार म्हणाले की, सर्व्हेवर अवलंबून राहून कुणी निष्कर्ष काढू नये. सर्व्हे नेहमी येत असतात. त्यात ते अनेकवेळा खरे खोटे असतात. आताच पाच राज्यातील विधानसभेच्या निवडणुका झाल्या. त्याचे सर्व्हे वेगळे आकडे सांगत होते. पण प्रत्यक्षात लोकांनी अंतिम निकाल वेगळा दिला अशा शब्दात पवारांनी लोकसभा निवडणुकीबाबत आलेल्या सर्व्हेवर प्रतिक्रिया दिली आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात एकूण ४८ जागा आहेत. इथं काँग्रेस-उबाठा-राष्ट्रवादी यांच्या महाविकास आघाडीचा पगडा भारी असल्याचं दिसून येते.

## आता कोर्ट बार असोसिएशन पण बसणार उपोषणाला



**■मुंबई। नितीन देवळेकर,**

मुंबई सत्र न्यायालयातील काही न्यायालये स्थलांतरित करण्याच्या प्रस्तावाविरोधात सेशन कोर्ट बार असोसिएशनने साखळी उपोषण सुरू केले आहे. वरिष्ठ पातळीवरून न्यायालये स्थलांतराचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत अद्याप कुठलेही ठोस आश्वासन देण्यात आले नाही. परिणामी २ जानेवारीपासून बेमुदत साखळी उपोषण आणि आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा सेशन कोर्ट बार असोसिएशनतर्फे देण्यात आला आहे. फोर्ट येथील दिवाणी व सत्र न्यायालयाच्या इमारतीतील आठ न्यायालये माझगावच्या नवीन न्यायालय इमारतीत हलवण्याचा प्रस्ताव आहे. या प्रस्तावाला तीव्र विरोध करीत बार असोसिएशनने गुरुवारपासून साखळी उपोषणाची सुरुवात केली. शुक्रवारी सलग दुसऱ्या दिवशी आंदोलन सुरू ठेवल्यानंतरही वकिलांच्या मागण्यांबाबत वरिष्ठ न्यायालय प्रशासनाकडून कुठलेही ठोस लेखी आश्वासन देण्यात आलेले नाही. त्यामुळे वकिलांनी आंदोलन तीव्र करण्याचा पवित्रा जाहीर केला आहे. बेमुदत उपोषणामध्ये दरदिवशी साधारण ५०० वकील सहभागी होतील, असे असोसिएशनचे अध्यक्ष रवी जाधव यांनी सांगितले.

## सोसायटीतील फ्लॅटमध्ये दहशतवादी, पोलिसांना फोन, इमारतीखाली मोठा फौजफाटा अन् मग...



**■मुंबई। विशाल कारंडे,**

सोसायटीच्या आवारात दहशतवादी घुसल्याचा खोटा दावा करणाऱ्या गोराई गृहनिर्माण संस्थेचे ५८ वर्षीय अध्यक्ष भूषण नारायण पालकर यांना बोरिवली पोलिसांनी अटक केली आहे. याबाबतची माहिती मिळताच, रविवारी सकाळी मोठ्या संख्येने पोलिसांची पथकं घटनास्थळी दाखल झाली. अतिरिक्त फोर्सची मागणी करण्यात आली होती. सोसायटीला चारही बाजूंनी पूर्णपणे वेढा घातल्यानंतर पोलिसांनी आवारात आणि आसपासच्या रस्त्यावर सार्वजनिक प्रवेशाला बंदी घातली. डीसीपी अजय कुमार बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली झोन ११ मधील वरिष्ठ अधिकारी निनाद सावंत, वरिष्ठ पोलिस निरीक्षक ज्योती भोपळे आणि बोरिवली पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रदीप काळे यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांनी सोसायटीमध्ये प्रवेश केला आणि ज्या खोलीला दहशतवाद्यांच्या उपस्थितीची माहिती देण्यात आली होती, त्या खोलीला वेढा घातला. दरवाजा ठोठावल्यानंतर पोलिस अधिकारी तातडीने घरात दाखल झाले. कसून शोध घेतल्यानंतर तिथे राहात असलेले मदन प्रजापती आणि त्याच्या कुटुंबीयांची चौकशी करण्यात आली. ते दोन महिन्यांपासून भाडेकरू असून शेजारीच गिफ्ट शॉप चालवत असल्याची माहिती समोर आली आहे.

या घराचा मालक पप्पुराम सुतार (पाली, राजस्थानचा रहिवासी) त्याने प्रजापती आणि त्याच्या नातेवाईकांना खोली भाड्याने दिली होती. घराच्या झडतीदरम्यान काहीही संशयास्पद आढळून आले नाही, अशी माहिती बोरिवली पोलिस स्टेशनच्या अधिकाऱ्याने दिली.

## राज्यावर जलसंकट, अजित पवार यांची कबुली



**■पुणे। भावना जैन,**

राज्यातील सर्व धरणांतील पाणीसाठा कमी होत असून राज्यावर जलसंकट ओढावले असल्याची कबुली राज्याचे उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांनी येथे सोमवारी दिली. पिण्यासाठी पाणीपुरवठा प्राधान्याने करण्याची सूचना राज्याच्या जलसंपदा विभागाला दिली असून त्यानुसार योग्य ती कार्यवाही केली जाईल. जुलै २०२४ पर्यंत पिण्यासाठी पाणी राखीव ठेवले जाईल. त्यासाठी मार्च महिन्यात कालवा समितीची बैठक होईल, असेही त्यांनी जाहीर केले. अजित पवार यांनी सोमवारी पुण्यात पत्रकारांशी संवाद साधला. राज्यातील मराठवाडा, कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि उर्वरीत महाराष्ट्रात पाण्याचे साठे गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी आहेत, असे त्यांनी सांगितले. यंदा पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी झाल्याने अनेक ठिकाणी पाणी टंचाईच्या झळा बसण्यास सुरुवात झाली आहे. त्यानुसार मंत्रिमंडळाच्या प्रत्येक बैठकीमध्ये पाणीसाठ्याबाबत आढावा घेतला जात आहे.

## नोकरी शोधणाऱ्या तरुणाला २४ कोटी जीएसटी थकबाकीची नोटीस, तपासात धक्कादायक माहिती समोर




**■मुंबई। विशाल पाटील,**

पालिकेत कंत्राटी पद्धतीवर काम करणाऱ्या तरुणाची नोकरी गेल्याने त्याचा नोकरीचा शोध सुरू होता. त्यातच अचानक त्याच्या हातामध्ये एक नोटीस येऊन पडली. ही साधीसुधी नोटीस नव्हती, तर तब्बल २४ कोटी रुपयांचा जीएसटी थकविल्याचे त्यात नमूद केले होते. या तरुणाला नोटीस वाचून धक्काच बसला. त्याने थेट जीएसटी भवन गाठले आणि आपली परिस्थिती मांडली. त्यावेळी त्याच्या कागदपत्रांचा गैरवापर करून सहा ते सात जणांनी चक्क कंपनी सुरू करून त्याला संचालक केल्याचे समोर आले. यानंतर चेंबूर पोलिस ठाण्यात सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाणे महापालिकेत कंत्राटी पद्धतीवर काम करणाऱ्या रितेश पाटील हा तरुण सन २०२२मध्ये बेरोजगार होता. नोकरीच्या शोधात असताना त्याला रस्त्यावर बँकेत लिपिक, शिपाईपदाची भरती अशी जाहिरात दिसली आणि त्याखाली मोबाइल क्रमांक देण्यात आले होते.

रितेशने यातील एका मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला असता समोरील तरुणाने वैभव असे नाव सांगितले. वैभव याने रितेशकडून अर्ज भरून घेतला आणि पॅनकार्ड, आधारकार्ड तसेच बँकेत खाते उघडण्यासाठी आवश्यक कागदपत्रांवर सह्या घेतल्या. काही दिवसांनी रितेशला पुन्हा फोन आला आणि व्हिडीओ कॉल करून समोर पॅनकार्ड आणि आधारकार्ड दाखविण्यास सांगण्यात आले.

# ऑरेंज गेट ते मरीन ड्राइव्ह बोगद्यासाठी ७३२६ कोटींचे कर्ज, एमएमआरडीए २५ वर्षासाठी कर्ज घेणार

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या महत्त्वाकांक्षी अशा ऑरेंज गेट, पूर्वमुक्त मार्ग ते मरीन ड्राइव्ह बोगदा (भुयारी मार्ग) प्रकल्पासाठी ९१५८ कोटी रुपये इतका खर्च येणार आहे. त्या निधीतील ७३२६ कोटींचा निधी कर्ज रूपाने उभारण्याचा निर्णय एमएमआरडीएने घेतला आहे. २५ वर्षांसाठी हे कर्ज घेण्यात येणार आहे. तर या कर्जाची परतफेड मुंबई पारबंदर प्रकल्पातील (शिवडी-न्हावाशेवा सागरी सेतू) आणि मुंबई प्रवेशद्वारावरील पथकर नाक्यावरील पथकर वसुलीतून




करण्यात येणार आहे. चेंबूरवरून सीएसएमटीला जाणे सोपे व्हावे आणि वाहतूक कोंडी दूर व्हावी यासाठी एमएमआरडीएने २०१३ मध्ये १६.८ किमी लांबीचा पूर्वमुक्त मार्ग बांधला. या मार्गामुळे चेंबूर ते सीएसएमटी अंतर केवळ २० ते २५ मिनिटांत पार करणे शक्य झाले आहे. मात्र ऑरेंज गेटजवळ आल्यानंतर नरिमन पॉईंट, मरीन ड्राइव्हच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना वाहतूक कोंडीत अडकावे लागते. या वाहतूक कोंडीतून वाहनांची सुटका करण्यासाठी एमएमआरडीएने पूर्वमुक्त मार्ग, ऑरेंज गेट ते मरीन ड्राइव्ह दरम्यान भुयारी मार्ग बांधण्याचा निर्णय घेतला आहे. या मार्गामुळे चेंबूर ते मरिन ड्राइव्ह असा प्रवास वेगवान होणार आहे. चर्चगेट, कुलाबा, नरिमन पॉईंट, मरीन ड्राइव्ह येथील वाहतूक कोंडी सुटेल. आराखड्यानुसार हा मार्ग ३.५ किमीचा असणार असणार आहे. अशा या प्रकल्पाच्या कामाचे कंत्राट एल अँड टी कंपनीला देण्यात आले आहे. तर या प्रकल्पाचा खर्च पुन्हा फुगला असून आता तो ९१५८ कोटींवर गेला आहे. तर सध्या आर्थिक अडचणीत असलेल्या एमएमआरडीएला हा खर्च / निधी कसा उभारायचा हा प्रश्न होता. हा प्रश्न अखेर एमएमआरडीएने कर्ज उभारणी करण्याचा निर्णय घेत सोडविला आहे.

# प्रकाश आंबेडकरांच्या सभेच्या व्यासपीठाचा मागचा भाग कोसळला; सभास्थळी धावपळ अन् गोंधळ...

■नागपूर। प्रतिनिधी,

वंचित बहुजन आघाडीतर्फे मनुस्मृती दिनानिमित्त सोमवारी नागपुरातील कस्तुरचंद पार्कवर स्त्रीमुक्ती दिन परिषदेचे आयोजन केले. मात्र, या सभेसाठी उभारलेल्या भव्य व्यासपीठाचा मागचा भाग (बॅकड्रॉप) लोखंडी अँगलसह अचानक कोसळला. हजारोंच्या गर्दी असलेल्या मैदानात या घटनेमुळे धावपळ झाली. सुदैवाने या घटनेत कुणीही जखमी झाले नाही. घटनेनंतर लगेच प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी आणि छायाचित्रकारांनी व्यासपीठाकडे धाव घेतली. मात्र, या भागात चित्रिकरण करण्यास काही



कार्यकर्ते प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना आठकाठी आणत होते. त्यामुळे या ठिकाणी मोठा गोंधळ उडाला होता. सोमवारी नागपुरातील कस्तुरचंद पार्कवर बहुजन आघाडीतर्फे मनुस्मृती दिनानिमित्त स्त्रीमुक्ती दिन परिषद आयोजित केली. या परिषदेला अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर, वंचितच्या प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर आणि प्रदेश उपाध्यक्ष निशा शेंडे शहरात दाखल झाल्या होत्या. काँग्रेसच्या स्थापना दिनानिमित्त २८ ला जाहीर सभा आयोजित करण्यात आल्याने त्यापूर्वी वंचितने स्त्रीमुक्ती परिषद आयोजित करून शक्तिप्रदर्शन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी कस्तूरचंद पार्कवर भव्य असे व्यासपीठ उभारण्यात आले. गेल्या दोन दिवसांपासून व्यासपीठाचे काम सलग सुरु होते. सोमवारी सकाळी व्यासपीठाचे उर्वरित काम पूर्ण झाले. व्यासपीठावर बाळासाहेब आंबेडकर यांचे आगमन होण्यापूर्वीच व्यासपीठाचा मागचा भाग (बॅकड्रॉप) लोखंडी अँगलसह कोसळला. त्यामुळे एकच धावपळ उडाली. या घटनेमुळे एवढ्या मोठ्या मैदानात पळापळ झाली. या घटनेचे चित्रिकरण करण्यास गेलेल्या प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधी आणि छायाचित्रकारांनी धाव घेतली असता काही कार्यकर्त्यांनी चित्रिकरण करण्यास मज्जाव केला.

# बाजीराव रस्त्यावर अपघात, मोटारीवर आदळून दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू




■पुणे। प्रतिनिधी,

मोटारीवर आदळून दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना बाजीराव रस्त्यावरील राणा प्रताप उद्यानासमोर मध्यरात्री घडली. अपघातात दुचाकीवरील सहप्रवासी तरुण जखमी झाला. गुंजन दत्तात्रय सोनवणे (वय २५, रा. कोथरुड) असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. अपघातात दुचाकीवरील सहप्रवासी तरुण शुभम गवांदे जखमी झाला आहे. याबाबत दिलीप पुरोहित (वय २१, रा. प्राधिकरण, निगडी) याने खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोटारचालक पुरोहित मध्यरात्री दोनच्या सुमारास बाजीराव रस्त्याने निघाला होता. त्यावेळी दुचाकीस्वार सोनवणे आणि त्याचा मित्र गवांदे भरधाव वेगाने निघाले होते. राणा प्रताप उद्यानासमोर भरधाव दुचाकी मोटारीवर आदळली. अपघातात सोनवणे गंभीर जखमी झाला. सोनवणे आणि त्याचा मित्र गवांदे यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच सोनवणेचा मृत्यू झाला होता. पोलीस उपनिरीक्षक विनय जाधव तपास करत आहेत.

# 'नोटबंदी यशस्वी,' अर्थतज्ज्ञ अनिल बोकील यांचा दावा; म्हणाले, 'करप्शन परफेक्शन इंडेक्समधून...'

■यवतमाळ। प्रतिनिधी,

देशात २०१६ एका बेसावध क्षणी नोटबंदी जाहीर करण्यात आली. या 'नोटबंदी'च्या यशापयशावर आजही चर्चा घडत आहे. नोटबंदीच्या निर्णय प्रक्रियेत महत्वाची भूमिका बजावलेले अर्थतज्ज्ञ अनिल बोकील यांनी मात्र देशात नोटबंदी यशस्वी झाल्याचा दावा केला आहे.

राष्ट्रीय ग्राहक दिन कार्यक्रम व अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त येथील बचत भवनात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या




अध्यक्षस्थानी अकोला जिल्हा ग्राहक मंचचे अध्यक्ष सुहास आळसी होते. यावेळी जयंती समितीचे विदर्भ अध्यक्ष अजय मुंधडा, अ.भा.ग्राहक पंचायतीचे विदर्भ प्रदेशाध्यक्ष डॉ.नारायण मेहरे, सचिव नितीन काकडे, संघटन मंत्री अजय गाडे आदी उपस्थित होते.

भारतात नोटाबंदीनंतर बोटे उचलली जात होती. मात्र करप्शन परफेक्शन इंडेक्समधून नोटाबंदी यशस्वी झाली, हे समजते, असे बोकील यावेळी बोलताना म्हणाले. दोन हजार रुपयांची नोट छापण्यासाठी केवळ ३.५९ पैसे खर्च येतो. भारतातील एकशे चाळीस कोटी लोकसंख्येत एक टक्के लोकांकडे ४० टक्के संपत्ती आहे. १० टक्के लोकांकडे ७२टक्के संपत्ती आहे. तर शेवटच्या ५० टक्के लोकांकडे केवळ तीन टक्के संपत्ती असल्याचे बोकील म्हणाले. ६० वर्षांवरील सर्व नागरिकांना देशाची संपत्ती मानण्यासाठी मसुदा तयार करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. याची अंमलबजावणी झाल्यास ज्येष्ठ नागरिकांना चांगली पेन्शन मिळून कुटुंबात त्यांची काळजी घेणाऱ्यांची संख्या वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राष्ट्रवादापासून एक पाऊल पुढे टाकले तर तो मानवतावाद आहे. मानवतावादाने सर्व संघर्ष टाळता येतात. देशात विवेकबुद्धीने काम करण्याची गरज आहे, असेही बोकील म्हणाले. कार्यक्रमात उपस्थितांनी ग्राहक संरक्षणाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मार्मिक भाष्य; म्हणाले, '... अन्यथा आयकर विभागाचे पाहुणे घरी येतात'

■पिंपरी। प्रतिनिधी,

शहरात होणार असलेल्या शंभराव्या नाट्यसंमेलनाची जोरदार तयारी सुरु आहे. या नाट्यसंमेलनाच्या बोधचिन्हाचे अनावरण उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते सोमवारी आकुर्डीत झाले. यावेळी त्यांनी चांगलीच फटकेबाजी केली. संमेलनासाठी विविध संघटना प्रायोजकत्व स्वीकारणार आहेत. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील हेदेखील संमेलनाला मदत करणार असून ते सारखे पैसे घ्यायला बोलवत असल्याचे भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले. त्यावरून उपमुख्यमंत्री



अजित पवार यांनी फटकेबाजी केली रोखीत पैसे कोणी देत नाही. धनादेश किंवा आरटीजीएस देतात. रोखीत पैसे दिल्यास आयकर विभागाचे पाहुणे घरी येतात, असे त्यांनी म्हणताच जोरदार हशा पिकला. संमेलनासाठी आमदारही मदत करणार आहेत. त्यांना धन्यवाद देतो. आमदारांनी सांगूनही पैसे जमा केले नाही, तर माझे धन्यवाद माघार घेतो, असे म्हणताच सभागृह हास्यकल्लोळात बुडाले. पिंपरी-चिंचवड महत्त्वाचे शहर म्हणून देशात ओळखले जाते. त्यासाठी अनेकांचे योगदान आहे. शहरातील गंभीर प्रश्नांकडे मी लक्ष घातले आहे. १९९२ ते २०१७ मध्ये शहरातील जनतेने साथ दिली. गाववाले, बाहेरून आलेल्या सर्वांना पदे दिली. मिनी भारत म्हणून शहराकडे पाहिले जाते. शहराचा एकतर्फी विकास होऊन चालत नाही. साहित्य, कला, संस्कृतीला वेगळे महत्त्व आहे. केवळ विकास होऊन चालत नाही, त्याला सांस्कृतिक कार्यक्रम, साहित्याची जोड आवश्यक असते.

# शत्रूंना धडकी भरवणारी आयएनएस इम्फाळ नौदलात होणार दाखल; ब्राम्होस क्षेपणास्त्रांनी आहे सुसज्ज

■ठाणे। प्रतिनिधी,

भारतीय नौदलाच्या ताकदीत आणखी भर पडणार आहे. हिंदी महासागरात चीनच्या वाढत्या कारवायांच्या पार्श्वभूमीवर भारताच्या सागरी क्षमता वाढवणारी आयएनएस इम्फाळ मंगळवारी (26 डिसेंबर) भारतीय नौदलात अधिकृतरित्या सामील होणार आहे. विशेष म्हणजे आयएनएस इम्फाळ ही जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या ब्रह्मोस क्षेपणास्त्रांनी सुसज्ज असून स्वदेशी बनावटीचे स्टेल्थ गाइडेड क्षेपणास्त्र डिस्ट्रॉयर आहे. तसेच ईशान्य भारतातील



एखाद्या शहराचे नाव देण्यात आलेली ही पहिलीच युद्धनौका आहे. एप्रिल 2019 मध्ये राष्ट्रपतींनी त्याला मंजुरी दिली होती. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत मंगळवारी मुंबईतील नौदलाच्या डॉकयार्डमध्ये या युद्धनौकेचा सैन्यदलात समावेश करण्यात येणार आहे. या युद्धनौकेला मणिपूरच्या राजधानीचे नाव देण्यात आले आहे. राष्ट्रीय सुरक्षा आणि भारताच्या समृद्धीसाठी ईशान्येकडील राज्यांचे महत्त्व यातून स्पष्ट होते. या जहाजाचे वजन 7,400 टन असून एकूण लांबी 164 मीटर आहे. ही युद्धनौका कजमिनीवरून जमिनीवर मारा करणारी क्षेपणास्त्रे आणि जहाजविध्वंसक क्षेपणास्त्रे आणि टॉरपीडोने सुसज्ज आहे.

आयएनएस इम्फाळच्या बंदर आणि समुद्रात दीर्घ चाचण्या घेण्यात आल्या आहेत. त्या पूर्ण केल्यानंतरच 20 ऑक्टोबर रोजी आयएनएस इम्फाळला भारतीय नौदलाकडे सोपवण्यात आले.

# संगोपनाची जबाबदारी दोन्ही पालकांची, अल्पवयीन मुलीला अमेरिकास्थित पतीकडे सोपवण्याचे आदेश देताना उच्च न्यायालयाची टिप्पणी

■मुंबई। प्रतिनिधी,

स्त्री-पुरुष समानतेच्या युगात मुलांच्या संगोपनाची जबाबदारी ही आई-वडील दोघांचीही असल्याची टिप्पणी उच्च न्यायालयाने केली. तसेच, मुलीला घेऊन भारतात परतलेल्या महिलेला अमेरिकेत जन्मलेल्या अल्पवयीन मुलीचा ताबा अनिवासी भारतीय पतीकडे सोपवण्याचे आदेश दिले. मुलगा-मुलगी भेद न करता प्रत्येक आई आपल्या मुलाची सर्वतोपरी काळजी घेण्यास आणि प्रत्येक धोक्यापासून त्याचे संरक्षण करण्यास सक्षम असते. त्याचप्रमाणे, वडिलांनीही



मुलगा-मुलगी भेद न करता मुलाची काळजी आणि संरक्षण करण्यासाठी सक्षम असणे आवश्यक आहे, असे निरीक्षणही न्यायमूर्ती रेवती डेरे आणि न्यायमूर्ती गौरी गोडसे यांच्या खंडपीठाने उपरोक्त आदेश देताना नोंदवले. विभक्त पत्नी पाच वर्षांच्या मुलीला घेऊन जानेवारी महिन्यात भारतात परतली. त्यामुळे, मुलीला ताब्यात देण्याच्या आणि तिला सुखरूपपणे पुन्हा अमेरिकेत नेऊ देण्याच्या मागणीसाठी याचिकाकर्त्याने याचिका केली होती. लैंगिक समानतेच्या युगात आई-वडील दोघांवर मुलाच्या संगोपनाची तसेच त्यांच्या आर्थिक, भावनिक, सामाजिक आणि इतर गरजा पूर्ण करण्याची जबाबदारी आहे.

त्यामुळे, याचिकाकर्ता हा केवळ पुरुष असल्याने तो अल्पवयीन मुलीची काळजी घेण्यास, तिचे संगोपन आणि संरक्षण करण्यास असमर्थ असल्याचे म्हणणे अयोग्य ठरेल, असे न्यायालयाने याचिकाकर्त्याला दिलासा देताना म्हटले.

आई-वडिलांमधील मतभेदामुळे मुलीला त्रास सहन करावा लागला हे दुर्दैवी आहे. मुलीला फक्त दोन्ही पालकांचा सहवास मिळण्यापासूनच वंचित ठेवले जात नाही, तर अमेरिकी नागरिक म्हणून तिला तिथे मिळणाऱ्या अधिकार आणि विशेषाधिकारांपासूनही वंचित ठेवले जात आहे, असेही प्रतिवादीला अल्पवयीन मुलीचा ताबा याचिकाकर्त्याकडे सोपवण्याचे आदेश देताना न्यायालयाने नमूद केले.

# वाहन अडवून लूटमार करणाऱ्या सहा जणांना अटक, तक्रारदारच संशयित




■नाशिक। प्रतिनिधी,

चांदवड - मनमाड रस्त्यावर वाहन अडवून लूटमार करणाऱ्या सहा जणांना स्थानिक गुन्हे शाखेने ताब्यात घेतले. त्यांच्याकडून दोन लाख, ४८ हजार ७०० रुपये हस्तगत केले. विशेष म्हणजे या प्रकरणात तक्रारदारानेच दरोड्याचा कट रचल्याचे उघड झाले. चांदवड-मनमाड रस्त्यावर आमीर उर्फ शोएब सय्यद आणि साक्षीदार सर्फराज ताडे यांना काही संशयितांनी अडवून चाकुचा धाक दाखवत रोख रक्कम तसेच भ्रमणध्वनी असा दोन लाख, ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. जिल्हा पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांनी तपासाविषयी सूचना केल्या. स्थानिक गुन्हे शाखेच्या वतीने या गुन्ह्याचा तपास करण्यात आला असता गुन्हेगार हे मनमाड येथील असल्याचे लक्षात आले. पथकाने सराईत गुन्हेगार इंजमाम उर्फ भय्या सलीम सय्यद (२४), उजेर आसिफ शेख (२२), मोईन सय्यद, ओम शिरसाठ, हर्षद बिऱ्हाडे यांना ताब्यात घेतले. इंजमामची अधिक चौकशी केली असता वाहन चालक आमीर उर्फ शोएब सय्यद (२३. रा, मनमाड) याच्या सांगण्यावरून कट रचत चांदवड ते मनमाड रस्त्यावर हा दरोडा टाकल्याचा कट रचल्याचे उघड झाले. संशयितांच्या ताब्यातून रोख रुपये हस्तगत करण्यात आले. तपासी पथकाला उल्लेखनीय कामगिरीबद्दल १० हजार रुपयांचे पारितोषिक जाहीर करण्यात आले. आमीर आणि गाडी मालक सर्फराज यांचे पैशाच्या देवाण घेवाणीवरून वाद झाले होते. आमीरने या भांडणाचा वचपा काढण्यासाठी इतर साथीदारांच्या मदतीने दरोड्याचा कट रचला. यातील इंजमाम आणि उजेर हे सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर मनमाड पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.

# मिरा-भाईंदरमध्ये सखोल स्वच्छता मोहीम

■भाईंदर। प्रतिनिधी,

सध्या मुंबई महानगर क्षेत्राला प्रदूषणाने विळखा घातला आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईप्रमाणेच संपूर्ण मिरा-भाईंदर शहराची सखोल स्वच्छता (डीप क्लिनिंग) करण्यात येणार आहे. काही दिवसांपूर्वीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत रस्त्यावर उतरून डीप क्लिनिंग मोहिमेची सुरुवात केली. त्यापासून प्रेरणा घेऊन मिरा-भाईंदर महापालिकेने या मोहिमेचे आयोजन केले आहे. त्यामुळे या मोहिमेच्या शुभारंभाला मुख्यमंत्र्यांनाच पाचारण करण्याचे प्रयत्न प्रशासनाकडून सुरू आहेत. स्वच्छ भारत अभियान व राष्ट्रीय हवा शुद्धीकरण मोहीम अंतर्गत मुख्यमंत्र्यांनी मुंबईत सखोल स्वच्छता मोहीम सुरू केली आहे. ते स्वतः या मोहिमेत सहभागी झाले होते. त्याच धर्तीवर मिरा-भाईंदरमध्येही ३० डिसेंबरपासून या मोहिमेला सुरुवात होणार असून १५ मार्चपर्यंत ती सुरू राहणार आहे. हवेतील धुलीकण कमी करणे व शहरातील सर्व रस्ते सखोल पद्धतीने धुवून स्वच्छ करणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. प्रत्येक पथकाची जबाबदारी वर्ग दोनच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली असून त्यावर वर्ग एकच्या अधिकाऱ्यांचे नियंत्रण असणार आहे. सकाळी ७ ते दुपारी २ वाजेपर्यंत ही मोहीम राबवली जाणार आहे. त्यात महापालिका कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त स्वयंसेवी संस्था, बचत गट, राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यांनाही सहभागी होता येणार आहे. मोहिमेची सुरुवात ३० डिसेंबरला मिरा रोड येथील प्रभाग २० व २१ मध्ये होणार असून त्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आणण्याचे प्रशासनाचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# केंद्रीय वाणिज्य मंत्री घेणार मिठागरांच्या वादाचा आढावा

■भाईंदर। प्रतिनिधी,

मीठ उत्पादक व मीठ विभाग यांच्यात मिठागरांच्या मालकी हक्कावरून गेली अनेक वर्षे न्यायालयीन संघर्ष सुरू आहे. या न्यायालयीन लढाईच्या सद्यःस्थितीचा आढावा आता केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्याकडून घेतला जाणार आहे. त्यामुळे मीठ उत्पादक शिलोत्र्यांमध्ये आशेचा किरण निर्माण झाला आहे. विकसित भारत संकल्प यात्रेच्या निमित्ताने काही दिवसांपूर्वी केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल मिरा-भाईंदरमध्ये आले होते. त्यावेळी मीठ उत्पादकांच्या शिष्टमंडळाने त्यांची भेट घेतली होती. मिठागरांच्या मालकी हक्कावरून सुरू असलेल्या संघर्षामध्ये लक्ष घालावे, अशी विनंती शिष्टमंडळाने गोयल यांना केली होती. दुसरीकडे मिठागरांच्या जमिनी मिरा-भाईंदर महापालिकेकडे हस्तांतर व्हाव्यात, अशी मागणी पालिकेकडूनही गोयल यांच्याकडे करण्यात आली होती. शहरातील अनेक रस्ते, मैदाने अशी लोकोपयोगी आरक्षणे मिठागरांच्या जमिनीवर आहेत. या जमिनी महापालिकेकडे हस्तांतर होत नाहीत, तोपर्यंत त्या विकसित करणे शक्य होणार नाही. त्यामुळे ही आरक्षणे असलेल्या जमिनी लवकरात लवकर पालिकेकडे हस्तांतर व्हाव्यात, अशी विनंती महापालिकेने केली आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त संजय काटकर, अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर यांनी नुकतीच दिल्ली येथे पियुष गोयल यांची भेट घेतली. या वेळी माजी खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धेदेखील उपस्थित होते. मिठागरांच्या जागा बाजारमूल्याप्रमाणे पैसे घेऊन महापालिकेकडे हस्तांतर करण्याबाबत केंद्र सरकार सकारात्मक निर्णय घेण्यास तयार आहे. तसा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोरही ठेवण्याची तयारी गोयल यांनी दर्शवली आहे.

# भांडूप संकुलातील नव्या जलशुद्धीकरण प्रकल्पाचे काम जानेवारी अखेरीस सुरू होणार



■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईकरांना शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यासाठी भांडूप पश्चिमेकडे असलेल्या पालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्रात नवीन शुद्धीकरण प्रकल्प निर्माण करण्यात येणार असून त्याचे काम नवीन वर्षात सुरू होणार आहे. जुन्या प्रकल्पाचे आयुर्मान संपत आल्यामुळे पालिकेने हा साडे तीन हजार कोटींचा प्रकल्प हाती घेतला असून त्याचे काम लवकरच सुरू करण्यात येईल.

शहराबाहेर कित्येक किमी अंतरावर असलेल्या धरणांतील पाणी मुंबईकरांच्या घराघरात पोहोचण्यासाठी अत्यंत गुंतागुंतीची अशी त्रिस्तरीय यंत्रणा आहे. धरणातील पाणी २४०० मि.मी. ते ३००० मि.मी. व्यासाच्या जलवाहिन्यांद्वारे व ५५०० मि.मी. व्यासाच्या कॉंक्रिटच्या भूमीगत जलबोगद्याच्या सहाय्याने गुरुत्वाकर्षद्वारे पांजरापुर व भांडुप संकुल येथे आणले जाते. हे पाणी जलशुद्धीकरण केंद्रात निर्जंतुक केले जाते व तेथून एका महासंतुलन जलाशयात साठवून पुढील वितरणासाठी मुंबई शहरात ठिकठिकाणी असलेल्या २७ सेवा जलाशयापर्यंत पोहोचवले जाते. मात्र जलशुद्धीकरण करणारा हा प्रकल्प पालिकेने ४४ वर्षांपूर्वी बांधला असून त्याचे आयुर्मान आता संपत चालले आहे. हा प्रकल्प संरचनात्मकदृष्ट्या कमकुवत झाला असून त्याचे वापरण्यायोग्य आयुर्मानही संपत चालले आहे. त्यामुळे पालिकेने भांडूप संकुल परिसरात नवीन जलशुद्धीकरण प्रकल्प तयार करण्याचे ठरवले आहे. अर्थसंकल्पात तशी घोषणा करण्यात आली होती.

# बिबट्या आल्याची अफवा अन् वन विभागाची धावपळ

■मनमाड। प्रतिनिधी,

शहराला पाणीपुरवठा करणारे आणि सध्या मृतसाठा असलेले वाघदर्डी धरण नेहमीच चर्चेत असते. परंतु, सोमवारी मात्र ते वेगळ्याच कारणासाठी चर्चेत आले. या धरणावरील भिंतीवरून पहाटे अडीच वाजता बिबट्या आला आणि त्याने फिरताना डरकाळ्या फोडल्याची चित्रफीत समाजमाध्यमात प्रसारित झाल्याने शहरात एकच खळबळ उडाली. वन विभागाच्या पथकाने प्रत्यक्ष घटनास्थळी धाव घेऊन छाननी केली. शोध घेतला. परंतु, बिबट्याचा कुठलाही पुरावा आढळला नाही. कुणीतरी खोडसाळपणे चित्रफितीद्वारे अफवा पसरविल्याचे सिद्ध झाले. पहाटेपासून शहरातील वेगवेगळ्या



समाज माध्यमांतील गटांवर २८ सेकंदाची एक चित्रफीत प्रसारित झाली. त्यात वाघदर्डी धरणाच्या भिंतीवरून जाताना चट्टेपट्टे असलेला बिबट्या डरकाळे फोडतांना दिसत होता. ही चित्रफीत प्रसारीत होताच नागरिकांमध्ये याबाबत चर्चा सुरू झाली. वन विभाग, नगरपालिका आणि पोलीस ठाण्यात अनेकांनी ही माहिती कळवून याबाबतची विचारणा सुरू केली. सोमवारी सकाळी ११ वाजता येवला येथील वनरक्षक सोनाली वाघ या वाघदर्डी धरणावर दाखल झाल्या. वाघदर्डी धरणावरील रोपवाटीकेचे वनसेवक इरफान सय्यद हेही होते. त्यांनी चित्रफितीची शहानिशा करण्यासाठी धरणाच्या भिंतीवरून फेरफटका मारला. तेथे कुठे बिबट्याच्या पाऊलखुणा आढळतात का, याची तपासणी केली. आसपासचे ग्रामस्थ, नगरपालिकेचे कर्मचारी यांच्याकडेही याबाबत विचारणा केली. आसपासच्या शेतकर्यांच्या शेळ्या, मेंढ्या व पशुधन यांचे काही नुकसान तर नाही ना, याची खात्री करून घेतली. अखेर संपूर्ण तपासाअंती समाज माध्यमात प्रसारित झालेल्या चित्रफितीतील भिंत आणि प्रत्यक्ष धरणाची भिंत यात तफावत आढळली.

# नाशिक जिल्ह्यात चार संशयितांकडून तलवार, कुऱ्हाड जप्त

■नाशिक। प्रतिनिधी,

३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमिवर नाशिक ग्रामीण पोलिसांकडून घोटी आणि मालेगाव शहर परिसरात अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या चार जणांविरुध्द कारवाई करण्यात आली. अपर पोलीस अधीक्षक अनिकेत भारती आणि आदित्य मिरखेलकर यांच्या मार्गदर्शनाने ही कारवाई झाली.

मालेगाव येथील आझादनगर पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर शब्बीर नगर परिसरात अश्पाक शेख (२४), तारीक शेख (२५) यांच्या ताब्यातून धारदार तलवार, गोलाकार पाते असलेली कुऱ्हाड जप्त केली. त्यांच्याविरूध्द आझाद नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच इगतपुरी तालुक्यातील घोटी परिसरातील वासाळी ते बारशिंगवे रस्त्यावर संजय गभाले (३५), सुधीर कोरडे (३०, रा. वासाळी) यांच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना असलेली धारदार तलवार मिळाली. संशयितांविरूध्द घोटी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

यापुढेही अवैधपणे शस्त्रे बाळगणाऱ्यांविरोधात मोहीम सुरू राहणार असून नागरिकांनी अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्यांविषयी माहिती असल्यास ६२६२२५६३६३ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

# मुंबई पोलिसांकडून वर्षभरात साडेचारशे कोटींचे एमडी जप्त; नाशिक, नालासोपारा, कोल्हापूरमध्ये कारखाने उद्ध्वस्त

■मुंबई। प्रतिनिधी,

नववर्षाच्या पूर्वसंध्येला होणाऱ्या रेव्ह पार्ट्यांवर करडी नजर असलेल्या मुंबई पोलिसांनी या वर्षभरात सुमारे साडेचारशे कोटींचे अमलीपदार्थ जप्त केले आहेत. त्यात सर्वाधिक म्हणजे चारशे कोटींहून अधिक किमतीचे मेफ्रेडन (एमडी) जप्त करण्यात आले आहे. याशिवाय मुंबई पोलिसांनी वर्षभरात सुमारे चार हजार ८०० कोटी रुपयांचे अमलीपदार्थ नष्ट केले आहेत. यावर्षी मुंबई पोलिसांनी नाशिक व सोलापूर येथील एमडी या अमलीपदाथार्चे कारखाने उद्ध्वस्त करणाऱ्या मुंबई पोलिसांनी गेल्या दोन वर्षांत साडेचार हजार कोटींहून अधिक किमतीचे



एमडी जप्त केले आहे. या कारवाईत नाशिक, सोलापूर, नालासोपारा, कोल्हापूर व गुजरातमधील दोन एमडी निर्मिती करणारे कारखाने उद्ध्वस्त करण्यात आले आहेत. या वर्षातही सर्वाधिक म्हणजे ४०५ कोटी ५५ लाख रुपये किमतीचे एमडी जप्त करण्यात आले आहे. २०२३ मध्ये १३१९ गुन्ह्यांमध्ये एकूण ४३७ कोटी ९८ लाखांचे अमलीपदार्थ जप्त करण्यात आले. त्या प्रकरणी १७१८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. याशिवाय मुंबई पोलिसांनी वर्षभर कारवाई करून साडेसात कोटी रुपयांचा गांजा, ५० लाखांचे कोकेन, १० कोटींचे चरस, चार कोटी २१ लाखांचे हेरॉईन, ५८ लाखांचे एलएसडी, सात कोटी ८७ लाखांचे केटामाईन, सहा लाख रुपयांच्या प्रतिबंधित अल्प्राझोलम गोळ्या जप्त केल्या आहेत. तरुण व्यसनाधीन मेफ्रेडॉनमुळे (एमडी) 'झिरो' फिगर मिळते व ऊर्जा मिळते, असा अपप्रचार आहे, त्यामुळे सुंदर दिसण्यासाठी व तासनतास नाचण्यासाठी बारबाला एमडीचा वापर करत आहेत.